318

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २२/०३/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटी- ०८१५ / प्र.क्र.२७ / भाग-१२/ पोल-३, दिनांक २१ मार्च, २०२४.

**विषय** :- पुणे तसेच पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या बत्तीसाव्या तिमाही हप्त्यासाठी निधी वितरीत करणेबाबत.

******

**परिपत्रक** -

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटी- ०८१५ / प्र.क्र.२७ /भाग-१२/पोल-३, दिनांक २१ मार्च, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०३२११५३९५३२९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, पुणे शहर
पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७,

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**पुणे तसेच पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या बत्तीसाव्या तिमाही हप्त्यासाठी निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/भाग-१२/पोल-३**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक : २१ मार्च, २०२४

**वाचा :**

१. शासनाचे क्रमांक आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४,दि.१७.०९.२०१३ चे इरादा पत्र (Letter of Intent).

२. शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४,दि.१४.१०.२०१३.

३. महाराष्ट्र शासन आणि मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांचे दरम्यान दि.२८.१०.२०१३ रोजी झालेला करारनामा.

४ शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५.

५ शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२.४.२०१८.

६ शासन निर्णय, गृह विभाग क्र. संकीर्ण-२०१५/प्र. क्र. ६४/विशा -३(अ), दि.४.८.२०१७.

७ उपमहाव्यवस्थापक, मे. बीएसएनएल, पुणे यांचे दि.६.११.२०१७ रोजीचे पत्र.

८ अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१५.१०.२०२०, दि.२६.२.२०२१, दि.२५.२.२०२२, दि.२२.७.२०२२ व दि.८.१.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

९ मुख्य लेखा अधिकारी (TRA), मे. बीएसएनएल, पुणे यांचे दि.१२.७.२०२२ रोजीचे पत्र.

१० शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/भाग-९/पोल-३, दि.१७.१०.२०२२.

११ शासन कार्यादेश, गृह विभाग क्र.सीसीटी ०८१५ / प्र.क्र.२७ / भाग-११ / पोल-३,दि.२८.१०.२०२२, व दि.१५.२.२०२४

१२ शासन निर्णय,गृह विभाग क्र.सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/भाग-१२/पोल-३,दि.१९.५.२०२३,दि.४.९.२०२३

१३ संचालक, अलाईड डिजिटल यांचे दि.२७.९.२०२३ रोजीचे पत्र व देयके.

१४ मे. प्राईसवॉटरहाऊस कूपर्स कंपनी यांचा दि.१.३.२०२४,व दि. २७.२.२०२४ रोजीचा ई-मेल.

१५ पोलीस आयुक्त, पुणे यांचे पत्र जा.क्र. पशा-६ /यु.सी./३२ वा तिमाही/६२४/२०२४/१२४२, दि.८.२.२०२४.

१६ शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.१२.०४.२०२३.

**प्रस्तावना :**

पोलीस आयुक्त, पुणे यांचे अधिनस्त पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. कंपनीला दि.१७.०९.२०१३ रोजी इरादापत्र (Letter of Intent) देण्यात आले होते. संदर्भाधीन क्र.२ येथे नमुद गृह विभाग, शासन निर्णय दि.१४.१०.२०१३ अन्वये सदर प्रकल्पास व त्यासाठी येणाऱ्या संभाव्य रु.२२५ कोटी इतक्या रक्कमेच्या खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ येथे नमुद करारनाम्यानुसार सदरहू कंपनीला देय असणारी रक्कम

एकरकमी देय न करता, पुढील ६ वर्षाच्या कालावधीमध्ये (म्हणजेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर २०% आणि उर्वरित ८०% रक्कम २० समान तिमाही हप्त्यामध्ये) अदा करणे बंधनकारक होते.

पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाचे काम पुर्ण झाले असून सदर प्रकल्प दि.२७.१०.२०१५ रोजी कार्यान्वित (Go-Live) झाला. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२२.०७.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार शासन कार्यादेश (Work Order) दि.२८.१०.२०२२ अन्वये पुरवठादार मे. अलाईड डिजिटल सर्व्हीसेस लि. यांना दि.२७.०६.२०२२ ते दि.२६.०६.२०२३ पर्यंत किंवा नवीन पुरवठादारास प्रकल्पाचे काम हस्तांतरीत करेपर्यंत, जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२२.७.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार शासन निर्णय, गृह विभाग दि.१७.१०.२०२२ अन्वये पुणे तसेच पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी मे. अलाईड डिजीटल सर्व्हीसेस लि. आणि मे. बीएसएनएल यांच्या थकबाकीसाठी व Change Request इत्यादीसाठी रु.२५.३० कोटी तसेच सध्याचे पुरवठादार मे. अलाईड डिजीटल सर्व्हीसेस लि. यांच्या दि.२७.६.२०२२ ते दि.२६.६.२०२३ पर्यंत मुदतवाढीच्या कालावधीकरिता आवश्यक अतिरिक्त खर्चासाठी रु.२४.२८ कोटी असे एकूण रु.४९.५८ कोटी (जीएसटीसह) इतक्या वाढीव खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तद्नंतर आता उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.८.१.२०२४ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय झाला.

(1) HPC approved PIC's recommendation for the extension of the current SI (ADSL) services and annual increment on current O&M charges till 31st march 2024.

(2) HPC instructed the representative of CP office, Pune City to Finalize the RFP within 3 months procedure to onboard new SI should be done.

उक्त निर्णयानुसार शासन कार्यादेश (Work Order) दि.१५.२.२०२४ अन्वये पुरवठादार मे.अलाईड डिजिटल सर्विसेस लि. यांना दि.२७.०६.२०२३ ते दि.३१.३.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच प्रकल्प सल्लागार मे. पीडब्ल्युसी यांनी पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या विनंती प्रस्तावातील (Request For Proposal) तरतुदी व सेवा कराराच्या अटी व शर्ती प्रमाणे दि.१.३.२०२४ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार, पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या बत्तीसाव्या तिमाही हप्त्याचे (दि.२७.६.२०२३ ते दि.२६.९.२०२३), गणपती उत्सवाकरिता बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी अदा करावयाच्या रकमेसह व जीएसटी करासह एकूण रु.६,०२,२१,५७३/- (रुपये सहा कोटी दोन लाख एकवीस हजार पाचशे त्र्याहत्तर फक्त) इतक्या रक्कमेपैकी मे. अलाईड डिजिटल सर्व्हीसेस लि. या कंपनीला अदा करावयाची रु.४,५२,२१,५७३/- (रुपये चार कोटी बावन्न लाख एकवीस हजार पाचशे त्र्याहत्तर फक्त) इतकी रक्कम व सदर प्रकल्पासाठी मे. बीएसएनएल कंपनीने पुरविलेल्या नेटवर्क कनेक्टीव्हिटीसाठी अदा करावयाची

रु.१,५०,००,०००/- (रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) इतकी रक्कम अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाबाबत मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. आणि महाराष्ट्र शासन यांचे दरम्यान दि.२८.१०.२०१३ रोजी करार झाला आहे. सदर करारनाम्याच्या अनुषंगाने प्रकल्प सल्लागार मे. पीडब्ल्युसी कंपनीने सादर केलेल्या अहवालानुसार तसेच पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रानूसार पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या केलेल्या कामासाठी बत्तीसाव्या तिमाही हप्त्याचे, गणपती उत्सवाकरिता बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी अदा करावयाच्या रकमेसह व जीएसटी करासह एकूण रु.६,०२,२१,५७३/- (रुपये सहा कोटी दोन लाख एकवीस हजार पाचशे त्र्याहत्तर फक्त) इतक्या रक्कमेपैकी मे. अलाईड डिजिटल सर्व्हीसेस लि. या कंपनीला अदा करावयाची रु.४,५२,२१,५७३/- (रुपये चार कोटी बावन्न लाख एकवीस हजार पाचशे त्र्याहत्तर फक्त) इतकी रक्कम व सदर प्रकल्पासाठी मे. बीएसएनएल कंपनीने पुरविलेल्या नेटवर्क कनेक्टीव्हिटीसाठी अदा करावयाची रु.१,५०,००,०००/- (रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदरहू रक्कम आहरीत करण्यासाठी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना नियंत्रक अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यालय अधिक्षक, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी रु.४,५२,२१,५७३/- (रुपये चार कोटी बावन्न लाख एकवीस हजार पाचशे त्र्याहत्तर फक्त) इतक्या रकमेचा धनादेश मे. अलाईड डिजीटल सर्विसेस लि. कंपनीच्या **Indian Bank, Branch - Old Nagardas Road, Andheri East, Mumbai-400069, Current Account, Account No-50516647020, IFSC Code-IDIB000A633, MICR No.400019112** या खात्यावर जमा करावा. तसेच रु.१,५०,००,०००/- (रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) इतक्या रकमेचा धनादेश मे. बीएसएनएल कंपनीच्या बँक ऑफ बडोदा, सानस प्लाझा, शुक्रवार पेठ, सुभाष नगर, पुणे या बँकेच्या खाते क्र.**07910200001275, IFSC: BARB0SUBHAS** या खात्यावर जमा करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा "मागणी क्र. बी-१०, ४०५५- पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००)(०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) योजनेतर योजना-५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४.     सदर देयक पुणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या करारनाम्यात नमूद केल्यानुसार यासाठी लागू असलेल्या सर्व प्रचलीत कर व इतर वजाती वसूल करुन अदा करण्यात यावे.

५.     सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम,१९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.१२.०४.२०२३ अनुसार सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाच्या प्रथम ९ महिन्यांच्या कालावधीसाठी अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६.     सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३२११५३९५३२९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2024.03.21 15:49:18 +05'30'

**( कैलास गायकवाड )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
३. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे.
६. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, पुणे .
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
८. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
९. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
११. मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि., प्रिमाईसेस नं. १३-ए, १३ वा मजला, अर्नेस्ट हाऊस, बॅकबे रेक्लेमेशन, एनसीपीए रोड, ब्लॉक III, नरीमन पाईंट, मुंबई-२१.
१२. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
१३. कक्ष अधिकारी, अर्थसं-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती, पोल-३.